## दिशा समिती बैठक
## दिनांक 05.09.2019 चे इतिवृत्त

दिनांक 05.09.2019 रोजी दु. 3.00 वा दिशा समिती बैठक मा.खासदार, उस्मानाबाद जिल्हा मा.श्री.ओमप्रकाश राजेनिबांळकर यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण ,जिल्हा परिषद सभागृह येथे आयोजित करण्यात आली होती.सदर बैठकीस सन्मानीय अध्यक्ष तथा खासदार उस्मानाबाद जिल्हा , मा.श्री.नेताजी पाटील, अध्यक्ष , जि.प., उस्मानाबाद, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., उस्मानाबाद, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, समितीमधील इतर सदस्य व खाते प्रमुख उपस्थित होते.

बैठकीचे सुरुवातीस मा.अध्यक्ष यांचे हस्ते जिल्हयातील दोन शेतकऱ्यांना पंतप्रधान मानधन योजनेचे पेन्शनकार्ड वितरीत करण्यात आले.

बैठकीत **विषयनिहाय खालील प्रमाणे चर्चा करण्यात आली.**

| अ. क्रं. | **बैठकीचा विषय व चर्चा** | **कार्यवाही करणारी यंत्रणा** |
|---|---|---|
| 1. | **<u>प्रधानमंत्री ग्रामसडक योजना ( पीएमजिएसवाय)</u>**<br><br>प्रधानमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत टप्पा 10 व 11 मध्ये जिल्हयात एकुण 45 पैकी 44 रस्त्याचे कामे पुर्ण झाली असून एक काम रद्य करण्यात आले आहे अशी माहिती संबधित कार्यकारी अभियंता यांनी दिली.<br><br>**सभापती पं.स.,तुळजापूर :-** तुळजापुर तालुक्यात केलेल्या रस्त्याचे कामे केल्यानंतर तीन महिन्यातच खराब झाले आहेत असे निदर्शनास आणुन दिले.<br><br>**मा.अध्यक्ष :-** सदर निकृष्ठ व खराब झालेल्या रस्त्याची कामे पुणे झाल्यानंतर कामाची तपासणी संबधित क.अभियता /उप.अभियंता/कार्य.अभियंता यांनी केली नाहीत का ? अशी विचारणा केली. जी रत्याच्या कामे निकृष्ठ व खराब झाले आहेत त्यास गुत्तेदार व संबधित अधिकारीही जबाबदार आहेत त्यामुळे सदरील खराब झालेल्या रस्त्याच्या कामाची चौकशी करुन जबाबदार असलेल्या अधिकारी व गुत्तेदारावर कार्यवाही करण्याचे आदेश दिले.<br><br>**अध्यक्ष, जिल्हा परिषद :-** पळसवाडी व शेकापुर गावांचे रस्त्याचे कामे बंद | कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना. उस्मानाबाद |

Scanned by CamScanner

आहेत. (33 फुट साखळीचे काम) संबधित यंत्रणेस वारंवार रस्त्याचे काम पुर्ण करणेबाबत पत्र दिले आहेत. शेतकऱ्याच्या आडमुठे धोरणामुळे सदर रस्त्याचे काम बंद आहे. कायदयाच्या सर्व बाबीचे अनुपालन करुन सदरील रस्त्याचे काम तात्काळ पुर्ण करणे बाबत मा. अध्यक्ष , जिल्हा परिषद यांनी मागणी केली.

**मा. अध्यक्ष** :- तहसीलदार व संबधिताची बैठक घेऊन सदरील रस्त्याचे काम तात्काळ पुर्ण करण्यात यावे. जिल्हयातील सर्व रस्त्यांच्या कामाचा आढावा घेण्याकरिता स्वतंत्र बैठक आयोजित करावी. तसेच जिल्हयातील रस्त्याचे जे कामे निकृष्ठ झालेली आहेत त्यांची चौकशी करुन संबधित अधिकारी व गुत्तेदार याची चौकशी करुन जबाबदार असणाऱ्या अधिकारी व गुत्तेदारावर कार्यवाही करण्यात यावी. तसेच सदर योजने अंतर्गत जिल्हयात आवश्यक तेथे नविन ग्राम सडकांचे प्रस्ताव मंजुरीसाठी शासनास सादर करण्यात यावेत.

**सनमान्यीय दिशा समिती सदस्य श्री कैलास पाटील** :- मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अतर्गत उस्मानाबाद तालुक्यातील अबेहोळ-जुनोनी-वलगुड-झरेगाव रस्त्याचे काम अतंत्य निकृष्ठ झाले आहे.रस्ता पुर्ण होऊन जेमतेम दोन चार महिन्याचा कालावधीही झालेला नसताना संपुर्ण डांबरी रस्ता उखडलेला असुन रस्त्यावर झालेला कोटयावधी रुपयाचां खर्च पाण्यात गेला आहे.

**कार्यकारी अभियंता (प्रधानमंत्री)** :- सदर खराब झालेल्या रस्त्याची पृष्ठभागाची दुरुस्ती करण्यासाठी निवीदा अटी व शर्ती नुसार कामाचे ठेकेदार बांधील असुन संबंधित ठेकेदाराकडुन तात्काळ रस्ता दुरुस्ती करुन घेण्यात येईल.

**मा.अध्यक्ष** :- खराब झालेल्या रस्ता दुरुस्ती चे काम करुन हा प्रश्न संपुर्ण पणे सुटणार नाही अल्प कालावधीत रस्ता नादुरुस्त कसा झाला, काम अंदाजपत्रकीय तरतुदी प्रमाणे झाले किवां नाही याची सखोल चौकशी करुन निकृष्ठ कामास जबाबदार ठेकेदार व सर्व संबंधित अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही अनुसरावी तसेच खराब झालेल्या

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | रस्ताच्या पृष्ठभागाची तात्काळ दुरुस्ती करुन रस्ता सुस्थितीत ठेवावा. | |
| 2. | **राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम (एनएसपी) इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती योजना**<br>**तहसीलदार :-** सदर योजने अंतर्गत 2019-20 मध्ये आजपर्यंत 200/- रु.प्रमाणे 54488 व रु.500/- प्रमाणे 340 लाभार्थ्यांना निवृत्ती वेतन दिल्याचे संबधित तहसीलदार यांनी सांगितले.<br>**सभापती पं.स.,तुळजापूर :-** सदर योजने अंतर्गत 500 रु. प्रमाणे निवृत्ती वेतन दिलेले 340 लाभार्थी हे एकटया भूम तालुक्यात देण्यात आले आहे. जिल्हयात ईतर तालुक्यात 500/- रु. प्रमाणे निवृत्ती वाटप का करण्यात आले नाही ? तसेच मागासवर्गीय लाभार्थ्यांना निवृत्ती वेतन उशीरा दिल्याबाबत तक्रारी आहेत.<br>**मा.अध्यक्ष :-** जिल्हयात भूम सोडून ईतर तालुक्यात 500 रु. प्रमाणे देय असलेले पात्र लाभार्थी नाहीत का ? रु.500/- प्रमाणे निवृती वेतनाबाबत काय नियम आहेत.<br>**तहसीलदार :-** याबाबत संबधित तहसीलदार हे स्पष्टपणे कांही सांगू शकले नाहीत तसेच ते योजनेचे स्वरुप व माहितीही सांगू शकले नाहीत.<br>**मा.अध्यक्ष :-** याबाबत योजनेची सविस्तर माहिती व सदर योजनेत वाटप केलेले लाभार्थ्याची माहिती आजच बैठक संपेपर्यंत सादर करण्याच्या सुचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या. | तहसीलदार, सामाजिक सहाय्य, जि.का. उस्मानाबाद |
| 3. | **डीजीटल इंडिया लँड रेकॉर्ड मिशनमोड प्रोग्राम (भुमी अभिलेखाचे संगणीकरण)**<br>**मा.अध्यक्ष :-** सदर योजनेचे स्वरुप कसे आहे व योजनेची सध्याची प्रगती कशी आहे ?<br>**जिल्हा भुमिलेख अधिकारी :-** सदर योजने अंतर्गत जिल्हयात सध्या उपलब्ध असलेले जुन्या भुमी अभिलेखाचे (नकला/उतारे व असे एकुण 9 प्रकारचे दस्तऐवज दस्तऐवज) सर्व कागदपत्राचे जिल्हा भूमी अभिलेख व तहसील कार्यालय यांचेकडुन स्कॅनिंग करुन ते जतन केले जातात. या करिता एजन्सीमार्फत सदर काम केले जात असुन साध्या जिल्हयातील 8 पैकी 6 तालुक्यातील काम एजन्सीकडुन पुर्ण झाले आहे. 2015 ला काम सुरु केले आहे. सदर कामासाठी तीन वर्षासाठी मुदत होती. सदर दस्तऐवज वेबसाईटवर उपलब्ध करुन दिला जाणार असुन तो ऑनलाईन पहाता येईल असे संबधित अधिकारी यांनी सांगितले. | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, उस्मानाबाद |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | **सभापती पं.स., तुळजापूर :-** तुळजापूर तालुक्यातील खानापूर, करजखेडा, अनसुर्डा, आंबेहोळ, कामेगाव, कावळेवाडी, कौडगाव, खामगाव, पिंप्री या गावातील काम पुर्ण झाले नाही तसेच पी.आर.कार्ड व नकला काढण्यासाठी गेले असता संबधित कार्यालयात कर्मचारी हजर नसतात. नकला साठी पैशाची मागणी करतात. अर्ज करुनही जमिनीची मोजणी लवकर होत नाही तीन-तीन महिन्यानंतर नंबर लागतो अशी तक्रार करुन याबाबत संबधित कामचुकार कर्मचारी यांचेवर कार्यवाही करण्याची त्यांनी मागणी केली.<br>**मा.अध्यक्ष :-** प्रलंबीत असलेले काम एजन्सीकडुन तात्काळ पुर्ण करुन घ्यावे व ज्या एजन्सीनी काम करण्यास अटीप्रमाणे उशीर केला आहे अशा संबधित एजन्सीकडुन नियमाप्रमाणे दंड वसुल करण्यात यावा.<br>**जिल्हा भुमिलेख अधिकारी :-** मोजणीसाठी कर्मचारी कमी असल्यामुळे जमिनीची मोजणी करण्यासाठी विलंब होतो हे मान्य केले तसेच अपुर्ण असलेले काम येत्या दोन महिन्यात पुर्ण होईल असे सांगितले.<br>**मा.जिल्हाधिकारी :-** जमिनीच्या मोजणीचे कामे वेळवर पुर्ण करणे बाबत तसेच मागणी प्रमाणे दस्त ऐवज सर्व शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देणे बाबत मा.जिल्हाधिकारी यांनी संबधित सर्व यंत्रणाना आदेश दिले. | |
| 4. | **<u>महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना :-</u>**<br>**उप.मुख्य.कार्य.अधि. (नरेगा) जि.प :- मग्रारोहयो** अंतर्गत जिल्हयातील 621 ग्रामपंचायती अंतर्गत 2,05,697 जॉबकार्ड वाटप करण्यात आले असुन त्या माध्यमाने 5,66,427 मजुरांची नोंदणी झालेली आहे. सध्या जिल्हयामध्ये शेततळे, विहीर पुर्नभरण, वृक्ष लागवड, सिंचन विहीर, शौचालय, शोषखडे व ईतर असे एकुण 24 प्रकारच्या कामानुसार ग्रामपंचायतकडे 6647 व यंत्रणाकडे 3785 असे एकुण 10432 कामे शेल्फवर उपलब्ध असल्याचे सांगितले.<br>**मा.अध्यक्ष :-** नरेगामधील कामामुळे साध्य काय झाले याचा आढावा महत्त्वाच्या असुन सन 2018-19 व 01 एप्रील-2019 ते आजपर्यंत नरेगा अंतर्गत बाबनिहाय किती कामे पूर्ण झाली आहेत त्याची सविस्तर कामानिहाय आकडेवारी सादर करण्याचे आदेश संबधित यंत्रणेस मा.अध्यक्ष यांनी दिले. एखादया गावामध्ये जर पाच विहीरीची कामे मंजूर असुन ती दोन-तीन वर्षापासून तीच कामे चालू असल्याचे दाखविली जातात. नरेगा अंतर्गत सर्व कामाना नियमानुसार टाईमबाँड ठरवून देण्यात यावा. जेथे नियमानुसार कामे वेळेवर होत नाहीत तेथे संबधिताची जबाबदारी निश्चीत करुन संबधितावर कार्यवाही करण्याच्या सुचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या.<br>नरेगा अंतर्गत बोअर पुर्नभरणचा कार्यक्रम घेता येतो का ? याबाबत विचारणा केली. | उप-मुख्य कार्य.अधिकारी, (नरेगा) / उप-जिल्हाधिकारी (रोहया) |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | **उप.मुख्य.कार्य.अधि. (नरेगा) जि.प :-** बोअर पुर्नभरणाचे कामे नरेगा अंतर्गत घेता येत नाही असा खुलासा केला.<br>**मा.अध्यक्ष , जिल्हा परिषद :-** शेतातील बोअर पुनर्भरण काम मनरेगा अंतर्गत समाविष्ट करणे बाबत शासनास प्रस्ताव पाठवावा ऊस वाहतुकीसाठी जिल्हयातील रस्त्याचे मातीकाम मोठया प्रमाणात झाले आहे अशा रस्त्याची कामे नरेगा अंतर्गत करण्यात यावी अशी मागणी केली. तसेच नरेगा अंतर्गत जिल्हयातील बरीच रस्ताची कामे मस्टर 0 अशी नोंद केली गेली असल्यामुळे अर्धवट होवून बंद पडली असल्याचे निदर्शनास आणून देवुन सदर रस्त्याची कामे पुर्ण करणे बाबत त्यानी मागणी केली.<br>**मा.अध्यक्ष :-** याबाबत बंद असलेले मस्टर बाबत तांत्रिक अडचण कशी सोडवता येईल याचा संबधित यंत्रणेने मार्ग काढुन याबाबत शासनाकडे आवश्यक पाठपूरावा करुन सदर अपुर्ण रस्त्याची कामे पुर्ण करणेचे मा.अध्यक्षं यांनी आदेश दिले. तसेच जिल्हा दुष्काळग्रस्त असल्यामुळे रोहयो अंतर्गत कांही कामे घेण्यासाठी जेथे जाचक अटी (एका गावात पाच विहीरची अट)आहेत त्या वगळण्याचा ठराव शासनास सादर करण्यात यावा.<br>**सभापती पं.स.,तुळजापूर :-नरेगा** अंतर्गत प्रत्येक घरावर रेनहार्वेस्टर करण्याची परवानगी मिळणे बाबत मागणी केली. | |
| 5.<br><br><br><br><br><br><br><br><br>6. | <u>प्रधानमंत्री उज्वला योजना – एलपीजी गॅस योजना -बीपीएल कुटूंब :-</u><br>**सदर बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी स्वतः उपस्थित नव्हते. या बाबत मा.अध्यक्ष यांनी त्याना बैठकीस अनुउपस्थिती बाबत नोटीस देण्यात यावी व याबाबत दिशा समितीच्या पुढील बैठकांना संबधित अधिकारी यांनीच उपस्थित रहावे कोणत्याही विभागाने प्रतिनीधी पाठवु नयेत अशा सक्त सुचना दिल्या.**<br>**प्रतिनिधी जि.पु.अ. :-** सदर योजनेत ग्राम स्वराज अभियान-02 अंतर्गत जिल्हयातील 488 गावामध्ये एकूण 25191 इतके गॅस जोडणी देण्यात आली आहे.<br><u>दिनदयाळ अंत्योदय योजना :-</u><br>**प्रतिनिधी जि.पु.अ. :-** पंडीत दिनदयाळ उपाध्याय अंत्योदय अभियाना अंतर्गत 42004 पात्र लाभार्थीना गॅस जोडणी करावयाचे लक्ष्यांक असुन आतापर्यंत 8424 पात्र लाभार्थ्याना गॅस जोडणी देण्यात आली आहे. के.वाय.सी. फार्म भरुन घेण्याची कार्यवाही चालू असुन लक्ष्यांकाप्रमाणे उर्वरीत पात्र लाभार्थ्याना गॅस जोडणी देण्यात येईल असे संबधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.<br>**मा.अध्यक्ष :-** सदर योजने अंतर्गत भूम व परंडा तालुक्यातून गॅस किट मिळत नसल्याबाबतच्या पात्र लाभार्थ्याच्या तक्रारी येत आहेत याबाबत संबधित एजन्सीना जोडणी वेळेवर करण्याचे आदेश व त्यानुसार गॅस जोडणीबाबत | जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्या. |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | कार्यवाही जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी करावी असे आदेश मा. अध्यक्ष यांनी दिले. | |
| 7. | **प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) :-**<br>**जिल्हा प्रशासन अधिकारी (नगरपालिका) :-** सदर योजने अंतर्गत जिल्हयातील 10 नगरपालिका अंतर्गत सन 2020 पर्यंत एकुण 5377 घरकुलांचे उदिष्ट असुन 2192 घरकुलांना बांधकामाची परवानगी देण्यात आली आहे यापैकी 279 घरकुलांचे बांधकाम चालु असल्याची माहिती त्यांनी दिली.<br>**मा. अध्यक्ष :-** सदर योजने अंतर्गत जिल्हयात आतापर्यंत एकाही घरकुलाचे बांधकाम पुर्ण न झाल्याचे निदर्शनास आणुन देवुन याबाबत विचारणा केली.<br>**सभापती पं. स., तुळजापूर :-** नळदुर्ग येथे 524 मंजूर घरकुलापैकी फक्त 18 घरकुलाचे काम सुरु आहे उर्वरीत घरकुलाचे काम सुरु करण्यास मंजूरी का देण्यात आली नाही ? अशी विचारणा केली.<br>**जिल्हा प्रशासन अधिकारी (नगरपालिका) :-** सध्या पावसामुळे घरकुल बांधकामाची प्रगती थोडी असुन लाभार्थ्याने मागणी केल्याशिवाय घरकुल बांधकामास मंजुरी प्रदान करता येत नाही व आर्थिक परिस्थितीमुळे लाभार्थी बांधकामासाठी लवकर मागणी करीत नाहीत असे सांगितले.<br>**नगराध्यक्ष, उस्मानाबाद :-** रमाई आवास योजनेत राज्य शासनाने शिथील केलेल्या अटी प्रमाणे प्रधानमंत्री आवास योजनेतही अडचणीच्या असणाऱ्या अटी केंद्र शासनाने शिथील कराव्यात याबाबत योग्यती कार्यवाही करण्याची मागणी राज्यशासनाकडे करुन पाठपुरावा करण्यात यावा अशी मागणी केली.<br>वक्फ बोर्डाच्या जमिनीवरील अनाधिकृत बांधकामे / गुंठेवारी प्रमाणे एन. ए. / 99 वर्षाच्या लिजवरील जागा याबाबत चर्चा होऊन उदिष्टाप्रमाणे घरकुल पुर्ण करण्यासाठी काय अडचणी आहेत याबाबत जिल्हयातील सर्व नगरपालिका यांचेकडुन बाबनिहाय अहवाल प्राप्त करुन पुढील बैठकीत सादर करावां **असे आदेश मा. अध्यक्षानी दिले.**<br>ग्रामीण आवास योजनेत घरकुल घेण्यासाठी गावठाणाची जागा असेलतर ग्रामपंचायत /ग्रामसेवक यांना नाहरकत/परवानगी देण्याबाबत अधिकार नाहीत असे संबधित अधिकारी यांनी निदर्शनास आणुन तसा 3 वर्षापुर्वी जी. आर. आला आहे असे सांगितले याबाबत जी. आर. मधील तरतुदीचा चुकीचा अर्थ न काढता योग्य तो काढुन गरजुसाठी आवास योजना राबविण्यात यावी असे मा. अध्यक्ष यांनी सुचित केले. | जिल्हा प्रशासन अधिकारी (न. पा), जि. का. |
| 8. | **स्वच्छ भारत मिशन (एसबीएम) :-**<br>**जिल्हा प्रशासन अधिकारी (नगरपालिका) :-** सदर अभियाना अंतर्गत जिल्हयात वैयक्तीक शैचालयाचे 18730 उदिष्ट असुन त्यापैकी 15357 | जिल्हा प्रशासन अधिकारी (न. पा), जि. का. |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | शौचालाचे बांधकाम पुर्ण झाले असुन साध्य टक्केवारी 82 टक्के आहे अशी माहिती दिली.<br>**सभापती पं.स.,तुळजापूर** :- तुळजापुर , नळदुर्ग शहारातील शौचालयाचे बांधकामे मोठया प्रमाणात अपुर्ण आहेत याबाबत विचारणा केली.<br>**जिल्हा प्रशासन अधिकारी (नगरपालिका)** :- शौचालयाचे बांधकाम पुर्ण झाले असुन त्याचे फोटो प्राप्त नसल्यामुळे कामे पुर्ण दाखविण्यात आले नाहीत असे सांगितले.<br>**मा.अध्यक्ष** :- सदर अभियान मा.पंतप्रधान यांचा महत्वाकांक्षी कार्यक्रम असल्यामुळे सदर अभियानातील कामे तातडीने पुर्ण करण्याच्या सुचना दिल्या. | |
| 9. | **<u>अमृत अभियान उस्मानाबाद (अटल मिशन) :-</u>**<br>**मा.अध्यक्ष** :- उस्मानाबाद शहरातील कांही भागातील पाणीपुरवठयाची पाईपलाईन चुकीच्या पध्दतीची व कमकुवत असुन सदर पाईपलाईन बदलण्यात येऊन याबाबत गुणवत्तापुर्ण कामे करुन पाणी पुरवठा कायमस्वरुपी होईल अशी कामे करणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सुचना दिल्या.<br>**जिल्हा प्रशासन अधिकारी (नगरपालिका)** :- अमृत अभियान अंतर्गत उस्मानाबाद शहरासाठी वाढीव पुरवठा योजने अंतर्गत उजनी, खांडवी, हातलादेवी येथे पंप व मोटार्स इंन्टालेशनचे काम पुर्ण झाले आहे. सध्या उस्मानाबाद शहरास 5.5 एमएलडी पाणी मिळते, एक्सप्रेस फिडर असुनसुध्दा पुर्ण क्षमतेने पाणी उपसा होत नाही . नवीन दोन पंप चालू झाल्यानंतर 6 एमएलडी पाणी मिळेल असे त्यांनी सांगितले.<br>**मा.अध्यक्ष जि.प.** :- सदर योजनेअंतर्गत मंजूरी प्रमाणे संपुर्णत: 8 एमएलडी पाणी पुर्ण क्षमतेने उपसा करुन ते उस्मानाबाद शहरापर्यंत आणण्यात यावे म्हणजे उस्मानाबाद शहराची गरज भागवून उर्वरीत पाणी टँकरने ग्रामीण भागास पुरवठा करता येईल असे सुचित केले.<br>**मा.जिल्हाधिकारी** :- सदर अभियान अंतर्गत संबधित एजन्सीकडे पाठपुरावा करुन उर्वरीत राहिलेले कामे 30 सप्टेंबर पर्यंत पुर्ण करण्यात यावेत. कामास विलंब झाल्याबाबत जबाबदार एजन्सीकडुन दंड वसुल करण्यात यावा असे आदेश दिले. | जिल्हा प्रशासन अधिकारी (न.पा) , जि.का. मुख्याधिकारी, न.प., उस्मानाबाद. |
| 10 | **<u>प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना :-</u>**<br>**प्रतिनिधी , जि.ग्रा.वि.यंत्रणा** :- सदर योजने अंतर्गत जिल्हयातील ग्रामीण भागासाठी 3484 घरकुलांचे लक्षांक असुन त्यापैकी 3021 घरकुलाना मंजूर देण्यात आली असुन त्यापैकी 2597 घरकुलांचे बांधकाम पुर्ण झाले असुन साध्य टक्केवारी 74.54 अशी आहे दिली.<br>**सभापती पं.स.,तुळजापूर** :- सदर योजने अंतर्गत अनुदान मिळाण्याकरिता, | प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यंत्रणा |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | खाते क्रमांक चुकीचा आहे अशा व ईतर किरकोळ चुकीसाठी चार-चार महिने लाभार्थ्यांची बिले निघत नाहीत यामुळे गरीब ग्रामस्थाना याचा नाहक त्रास होतो.<br>**प्रतिनिधी , जि.ग्रा.वि.यंत्रणा :-** अनुदान पेमेंटची ऑनलाईन सिस्टीम असुन चुका दुरुस्त असल्याशिवाय लाभार्थ्यांना घरकुलाचे पेमेंट करणे शक्य होत नाही.<br>**प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यंत्रणा :-** 2011 चे सर्वेनुसार जिल्हयातील ग्रामीण भागात सदर योजनेअंतर्गत एस.सी/एस.टी. चे पात्र लाभार्थी मिळत नाहीत. यासाठी याबाबत सर्वसाधारण घटकामधुन घरकुलांचे लक्षांक वाढवुन मिळणेबाबत शासनाकडे मागणी करण्यात येत आहे.<br>**अध्यक्ष जि.प. :-** एका घरकुलासाठी नागरी भागात 2.5 लाख व ग्रामीणभागात 1.5 लाख अशी निधीची तरतुद आहे याबाबत ग्रामीण भागासाठीही शहरी भागाप्रमाणे 2.5 लाख निधीची तरतुद करण्याची मागणी/प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात यावा अशी मागणी केली.<br>**मा.अध्यक्ष :-** सदर योजने अंतर्गत लक्ष्यांकाप्रमाणे विहीत मुदतीत जिल्हयातील घरकुलांची कामे पुर्ण करण्यात यावीत. | |
| 11 | **<u>दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना :-</u>**<br>**प्रतिनिधी, जिल्हा अभियान व्यवस्थापक :-** जिल्हा अभियान व्यवस्थापक कळंब येथे महिला मेळाव्यास उपस्थित असल्याचे उपस्थित प्रतिनिधी यांनी सांगितले. सदर योजने थोडक्यात स्वरुप अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांनी सांगितले. सदर योजने अंतर्गत जिल्हयात 1329 गरजूना प्रशिक्षण देण्याचे लक्षांक होते त्यापैकी आजपर्यंत 961 गरजूना प्रशिक्षण देण्यात आले असुन सध्या 292 व्यक्तीना प्रशिक्षण देणे चालू आहे. प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थ्यांपैकी 465 लाभार्थ्यांना जॉब मिळाल्याचे सांगितले.<br>**मा.अध्यक्ष :-** सदर योजने अंतर्गत प्रशिक्षण देण्यासाठी बारामती, पुणे, नाशिक, मुंबई व ईतर ठिकाणच्या ज्या एजन्सीना पत्र देण्यात आले आहेत ती सर्व पत्र सादर करण्यात यावीत. तसेच सदर योजने अंतर्गत 2019-20 मध्ये प्रत्येक ट्रेनिंग सेंटरवर प्रशिक्षणनिहाय घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांच्या नावाची यादी तसेच जॉब मिळालेल्या प्रशिक्षणार्थ्यांच्या नावाची यादी प्रत्यक्षात सादर करण्याच्या सुचना मा.अध्यक्ष यांनी संबधित यंत्रणेस दिल्या. | जिल्हा अभियान व्यवस्थापक |
| 12. | **<u>राष्ट्रीय ग्रामीण पाणीपूरवठा कार्यक्रम :-</u>**<br>**कार्यकारी अभियंता , ग्रा.पा.पुरवठा :-** सदर योजने अंतर्गत सन 2019-20 मध्ये 222 गावामध्ये 219 पाणी पुरवठा योजनाची कामे प्रस्तावीत आहेत. त्यापैकी 02 गावामध्ये पाणी पुरवठा सुरु झाला आहे अशी माहिती दिली. उर्वरीत कामे चालु आहेत अशी माहिती दिली. | कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पू., जिल्हा परिषद. |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | **सभापती पं.स.,तुळजापूर :-** सदर कार्यक्रम अंतर्गत अपुर्ण असलेले कामे व बंद असलेल्या योजनांची माहिती संबधित यंत्रणेस मागितली.<br><br>**मा.अध्यक्ष :-** सदर कार्यक्रम अंतर्गत जिल्हयात ज्या 219 पाणी पुरवठा योजना द्वारे ग्रामीण भागात पाणी पुरवठा करण्यात येणार आहे अशा सर्व 219 योजनांच्या काममाची सद्यस्थितीची, योजना व गावनिहाय सविस्तर माहिती प्रत्यक्षात सादर करण्याचे मा.अध्यक्ष यांनी संबधित यंत्रणेस आदेश दिले..<br><br>जीवन प्राधिकरणाकडील कामे केलेल्य गुत्तेदारास सदर कार्यक्रमात कामे देण्यातयेऊ नयेत. सदर योजनेत अपहार केलेल्या अधिकाऱ्याकडुन त्यांचे प्रापर्टीमधुन वसुलीची कार्यवाही करण्याचे आदेश दिले. अपुर्ण व बंद असलेले कामासाठी जबाबदार असलेल्या अधिकारी व गुत्तेदाराकडुनही नियमाप्रमाणे दंड वसुल करण्याच्या सुचना मा.अध्यक्ष यांनी संबधित यंत्रणेस दिल्या.<br><br>सदर कार्यक्रमात जर एखादा गुत्तेदार मंजूरी देवुन सुध्दा विहीत मुदतीत काम सुरु करीत नसेल तर नियमाप्रमाणे तात्काळ कार्यवाही करुन सदर काम ईतर गुत्तेदारास देण्याची कार्यवाही करुन वेळेवर काम न करणाऱ्या गुत्तेदारास ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्याची कार्यवाही संबधित यंत्रणेने करण्याचे आदेश मा.अध्यक्ष यांनी दिल्या.<br><br>ज्या गावामध्ये पाण्याचा स्त्रोत उपलब्ध आहे त्या गावात तात्काळ नरेगा मधून विहीरीची कामे सुरु करण्याची कार्यवाही करणेबाबत नरेगा व ग्रा.पा.पूरवठा यंत्रणेस मा.अध्यक्ष यांनी दिल्या. | |
| 13 | **<u>प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना (पीएमकेएसवाय) :-</u>**<br>**<u>एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम :-</u>**<br><br>**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी :-** सदर कार्यक्रम अंतर्गत जिल्हयात बॅच क्रं. 1,2,3 व 5 मध्ये एकुण 47 पाणलोटाची कामे मंजूरी होती. त्यापैकी बॅच क्रं.1,2,3 मधील कामे पुर्ण झाली आहेत. बॅच क्रं. 5 मधील कामे सध्या चालू आहेत. सदर कामावर 2244.61 तरतुद निधीपैकी 750.97 लाख खर्च झालेला आहे.<br><br>**मा.अध्यक्ष :-** सदर कार्यक्रम अंतर्गत खर्च कमी का झाला आहे ?<br><br>**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी :-** सदर कार्यक्रम अंतर्गत कांही क्लस्टर मध्ये अडचणी आल्यामुळे खर्च कमी झाला आहे.<br><br>**सभापती पं.स.,तुळजापूर :-** सदर कार्यक्रम अंतर्गत एकुण तरतुदीच्या पाणलोट विकास कामासाठी 56 टक्के खर्च केला जातो तर ईतर 44 टक्के खर्च कोणत्या बाबीसाठी केला जातो अशी विचारणा केली.या निधीमधुन हाती घेतलेल्या कामाचा तपशील देणे बाबत अध्यक्षांनी सुचना दिली.<br><br>**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी :-** सदर कार्यक्रमात प्रशासकीय खर्च 10 | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी. |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | टक्के, प्रेरक प्रवेश उपक्रमसाठी घटकासाठी 10 टक्के व उपजिवीका घटकासाठी 19 टक्के खर्च करण्यात येतो असे सांगितले.<br>**मा.अध्यक्ष :-** सदर कार्यक्रम अंतर्गत केलेल्या पाणलोटाच्या कामाची व खर्चाची माहिती देण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | |
| 14 | **<u>प्रधानमंत्री फसल बिमा योजना :-</u>**<br>**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी :-** प्रधानमंत्री पिक विमा योजना अंतर्गत सन 2018-19 मधील खरीप हंगामासाठी 723439 लाभार्थ्यांना 570.54 कोटी विमा मिळालेला आहे. 2018-19 रब्बी हंगामासाठी 773335 विमा प्रस्ताव असुन यादवारे 1058.08 कोटी रुपये विमा संरक्षित रक्कम आहे. 2018-19 मधील रब्बी हंगामाचा विमा मिळणे बाकी आहे.<br>सन 2019-20 खरीप हंगामामध्ये 11,56,682 विमा प्रस्तावादवारे 2039.23 कोटी विमा संरक्षित रक्कम आहे.<br>**मा.अध्यक्ष :-** 2018-19 मधील खरीप हंगामातील 12000 प्रस्तावाचे चुकीचे खाते क्रं. व ईतर त्रुटीमुळे विमा पैसे जमा झाले आहेत का अशी विचारणा मा.अध्यक्ष यांनी केली.<br>**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी :-** जिल्हयामध्ये खरीप 2018 मधील चुकीचे खाते क्रं व ईतर त्रुटीमुळे प्रलंबीत असलेले 12000 प्रस्तावाचा पिक विमा जमा करण्यात आला असुन सध्या विमा हप्ता भरुन शेतकऱ्याकडे रिसीप्ट आहे मात्र पैसे कंपनीस मिळाले नाहीत अशा 200 तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्या तक्रार कंपनीस पाठविण्यात आल्या असुन याबाबत सेतु केंद्राकडुन माहिती उपलब्ध करुन घेऊन सदर माहिती विमा कंपनीस सादर करण्यात येत आहे. 2018 मधील रब्बी हंगामातील पीक उत्पादनाच्या आधारावर पिक विमा देण्याची कार्यवाही चालू आहे. लोहारा व उस्मानाबाद तालुक्यासाठी सन 2017 साठी प्राप्त झालेले 29 कोटी रुपये मदत रक्कम एक आठवडयाचे आत शेतकऱ्यांचे खात्यावर जमा होतील असे सांगितले.<br>**मा.अध्यक्ष :-** जिल्हयामध्ये पिक विमा अंतर्गत तक्रारी उदभवू नयेत या दृष्टीने जिल्हयामध्ये जे पिक कापणी प्रयोग घेतले जातात ते नियमानुसार घेण्याची संबधिताकडुन खबरदारी घेण्यात यावी तसेच पंचाचे समक्ष सदर पीक कापणी प्रयोग घेण्यात यावेत अशा सुचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या. | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी. |
| 15 | **<u>स्वच्छ भारत मिशन ग्रामीण :-</u>**<br>**प्रतिनिधी :-सदर** कार्यक्रम अंतर्गत 128946 लाभार्थी अनुदानास पात्र होते त्यापैकी 115440 लाभार्थींना अनुदान वाटप केले आहे.<br>**मा.अध्यक्ष :-** सदर योजने अंतर्गत शौचालयाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे मात्र अदयाप अनुदान वाटप करावयाचे किती लाभार्थी शिल्लक आहेत ?<br>**उपमुख्य कार्यकारी अधिकारी :-** बांधकाम पूर्ण झालेले मात्र अनुदान वाटप | उपमुख्य कार्य.अधिकारी, (पाणी व स्वच्छता), जि.प. |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | करणे शिल्लक असलेल्या लाभार्थ्यांची संख्या 9390 असल्याचे सांगितले.<br>**पंचायत समिती , सभापती** :- सदर योजने अंतर्गत सांडपाणी व घनकचरा विल्हवाट करणेसाठी कांही तरतुद करण्यात यावी अशी मागणी केली. | |
| 16. | **सर्व शिक्षा अभियान :-**<br>**मा.अध्यक्ष** :- सदर अभियान अंतर्गत लक्षांकाप्रमाणे जिल्हयातील पात्र 100 टक्के विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके वाटप केली आहेत का अशी विचारणा मा.अध्यक्ष यांनी केली.<br>**शिक्षणाधिकारी प्राथमिक** :- सदर कार्यक्रम अंतर्गत जुलै-2019 अखेर 433.64 लाख निधी खर्च करण्यात आला आहे. सदर कार्यक्रम अंतर्गत 2019-20 मध्ये जिल्हयातील ईयत्ता 1 ली ते 5 वी च्या 109884 विद्यार्थ्यांना व 6 वी ते 8 वी च्या 71540 विद्यार्थ्यांसाठी पाठयपुस्तके उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. तसेच 1 ली ते 8 वीच्या वर्गातील 73314 अ.जाती, अ.जमाती व दारिद्ररेषेखालील मुलांना एक गणवेश संच वितरीत करण्यात आला आहे.<br>शासनाकडुन शाळा दुरुस्तीकरिता 110.45 लक्ष, अतिरिक्त वर्ग खोली बांधकामासाठी 11.60 लाख रु निधी मंजूर करण्यात आला आहे मात्र निधी प्राप्त झालेला नाही. निधी प्राप्त होताच दुरुस्तीची कामे सुरु करण्यात येतील असे सांगितले.<br>**मा.अध्यक्ष** :- जिल्हयातील जिल्हा परिषद अंतर्गत सर्व शाळा सुस्थितीत आणणेसाठी किती निधीची आवश्यकता आहे त्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना संबधित शिक्षणाधिकारी यांना देवुन शाळा दुरुस्तीची कामे गंभीरतेने व तात्काळ पुर्ण करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचना दिल्या. | शिक्षणाधिकारी, प्राथमिक, जि.प. |
| 17. | **मध्यान्ह भोजन योजना :-**<br>**शिक्षणाधिकारी, प्राथमिक** :- सदर योजने अंतर्गत जिल्हयातील 1 ली ते ई. 8 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी केंद्राकडील 25597 हजार व राज्याकडील 16955 हजार ईतका निधी मध्यान्ह भोजनावर खर्च झालेला आहे.<br>**मा.अध्यक्ष** :- जिल्हयातील सर्व शाळाना मध्यान्ह भोजन नियमाप्रमाणे दिले जाते का ? याबाबत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यानी शाळाना भेट देवुन तपासणी करण्याच्या मा.अध्यक्ष यांनी सुचना दिल्या तसेच वाशी व भूम तालुका याबाबत रेड रिजन मध्ये येत असुन याबाबत विशेष काम करावे. | शिक्षणाधिकारी, प्राथमिक, जि.प. |
| 18 | **राष्ट्रीय आरोग्य अभियान :-**<br>जिल्हा आरोग्य अधिकारी :- सदर अभियान अंतर्गत सन 2019-20 मध्ये माहे जुलै-2019 अखेरखालील प्रमाणे कामे पुर्ण झाल्याचे सांगितले.<br>1) कुटूंब कल्याण शस्त्रकियाचे 8309 उदिष्ट असुन त्यापैकी 2630 शस्त्रक्रिया | जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | करण्यात आल्या आहेत.<br>2) सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत एकुण 557 क्षयरुग्णाचे निदान करुन त्यांना पुर्ण उपचाराखाली आणण्यात आले आहे.<br>3) कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम अंतर्गत 192 कुष्ठरुग्ण उपचाराखाली आहेत.<br>4) जुलै 2019 अखेर 111328 इतके तापीचे रुग्णाचे रक्त नमुने तपासणी करण्यात आली त्यापैकी एक हिवतापरुण आढळुन आला.<br>5) राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण अंतर्गत 5540 उदिष्टापैकी एकुण 1709 मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.<br>6) राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत 0 ते 6 वर्ष वयोगटातील 128064 बालकापैकी 118353 (92 टक्के) बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे.<br>सदर कार्यक्रमाचा आढावा दर 15 दिवसांनी निती आयोगाच्या बैठकीत मा. जिल्हाधिकारी यांना देण्यात येतो.<br>**मा. अध्यक्ष :-** बालकांना आवश्यक औषधे कसा पुरवठा केला जातो ? तसेच आरोग्य उपकेंद्रावर सौर उर्जा युनीट बसविण्याची कार्यवाही करणे बाबत सुचना दिल्या.<br>**जिल्हा आरोग्य अधिकारी :-** आरोग्य उपकेंद्रावरुन अंगणवाडी पातळीवर बालकांना आवश्यक औषधे दिली जातात.<br>**सभापती ::-** ग्रामीण भागात लहान मुलांना वाफ देण्यासाठी तुळजापुर अंगणवाडी येथे सुविधा उपलब्ध करुन द्यावी. | |
| 19 | <u>**एकात्मिक बाल विकास योजना :-**</u><br>**उपमुख्य कार्यकारी अधिकारी :-** सदर योजना 1975 पासून राबविण्यात येत असुन बालकांच्या आरोग्याचा दर्जा सुधारणे हा सदर योजनेचा उद्येश आहे. सदर योजनेत शहरी भागात एक व ग्रामीण भागात 10 प्रकल्प मंजूर आहेत. सदर कार्यक्रम अंतर्गत जिल्हयात एकुण 1890 अंणवाडी केंद्र संख्या आहे. त्या अंतर्गत जिल्हयातील 113697 पैकी 110193 बालकांचे वजन घेण्यात आले असुन त्यापैकी 1950 बालकांचे वजन तीव्र स्वरुपात असल्याचे निदर्शनास आले आहे.<br>**मा. अध्यक्ष :-** जिल्हयातील तीव्र कमी वजनाची बालके व कुपोषित बालकाचे आरोग्य सुधारण्यात येवुन निती आयोगाच्या माध्यमातून बाहेर पडण्यासाठी प्रयत्न करण्यात यावा अशा सुचना मा. अध्यक्ष यांनी दिल्या. याबाबत बैठका घेऊन सविस्तर नियोजन करण्याच्या सुचना देण्यात यावा. | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (महिला व बालकल्याण), जि.प |
| 20 | <u>**डिजिटल इंडिया – पब्लिक इंटरनेट ऍसे प्रोग्राम :-**</u><br>**उप मु.का.अ. (पंचा.) :-** सदर कार्यक्रम अंतर्गत जिल्हयातील 621 ग्रामपंचायतीपैकी 583 ग्रामपंचायतीमध्ये बीएसएनएल ची हार्डवेअर जोडणी | बी.एस.एन.एल. यंत्रणा / उपमु.का.अ. |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | झाली आहे मात्र त्यापैकी एकाही ग्रामपंचायतीमध्ये इंटरनेट कनेक्टीव्हिटी सुरु नसल्याचे सांगितले. इंटरनेट सुविधा चालु असल्याबाबत प्रत्यक्षात बी.एस.एन.एल. यंत्रणेकडुन टेस्ट झाली नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जिल्हयातील महामार्गाचे कामामुळे अनेक ठिकाणी केबल तुटले आहेत असे त्यांनी निदर्शनास आणुन दिले. | (पंचा.)<br>उपजिल्हाधिकारी, महसुल / |
| | **बी.एस.एन.एल. प्रतिनिधी :-** 583 गावामध्ये हार्डवेअरची जोडणी झाली असुन तेथे वायफाय यंत्रणा बसविण्यात आली आहे. तसेच इंटरनेट कनेक्टिव्हीटीसाठी प्रति महा 999/- ग्रामपंचायतने भरणे आवश्यक आहे. तसेच याबाबत टेस्ट घेण्याचे काम पुणे येथील वरिष्ठ कार्यालयाकडुन चालू असल्याचे त्यांनी सांगितले.<br>**मा.अध्यक्ष :-** सदर कार्यक्रम अंतर्गत जिल्हयातील एकाही ग्रामपंचायतीमध्ये इंटरनेट चालू नसल्याबाबत मोठया प्रमाणात नाराजी व्यक्त करुन ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असल्याचे त्यांनी नमुद करुन त्यांनी पुढील कार्यवाहीसाठी **खालील प्रमाणे आदेश संबधित यंत्रणेस दिले**.<br>1) जिल्हयातील सर्व ग्रामपंयतीमध्ये इंटरनेट व ईतर सुविधा सुरु करण्याबाबत बीएसएनएल यंत्रणेने अत्यंतत गंभीरपणे नोंद घेवुन इंटरनेट सुविधा तात्काळ सुरु करण्याचे आदेश बीएसएनएल यंत्रणेस दिले.<br>2) सदर कार्यक्रम अंतर्गत कामे पुर्ण न होता व सुविधा पुर्ण पणे चालु झाली आहे का याची खात्री न करता कंत्राटदाराना बीले अदा का करण्यात आली आहेत याचा खुलासा बीएसएनएल यंत्रणेने करावा असे आदेश मा.अध्यक्ष यांनी दिले.<br>3) जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये बसविण्यात आलेल्या इंटरनेट सुविधाची क्रॉस चेकींग महाराष्ट्र शासनाचे अधिकारी /बीएसएनएल चे अधिकारी/ ग्रामपंचायत प्रतिनिधी यांचकडुन संयुक्तपणे करुन संयुक्त स्वाक्षरीचा अहवाल सादर करण्याचे आदेश उप.मुख्य कार्य.अधि. (ग्रामपंचायत), जि.प. यांना व संबधित यंत्रणेस दिले. | |
| 21 | **<u>प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना :-</u>**<br>**जिल्हा कौशल्य विकास अधिकारी :-** सदर कार्यक्रम अंतर्गत जिल्हयात एकुण 3 स्लॉटमध्ये 1669 पात्र उमेदवाराना प्रशिक्षण देण्यात आले असुन त्यापैकी 1455 उमेदवार पास झाले आहेत त्यापैकी 511 उमेदवाराना रोजगार मिळालेला आहे. उमेदवाराना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण प्रायव्हेट एजन्सीकडुन देण्यात येते असे त्यांनी सांगितले.<br>**मा.अध्यक्ष :-** सदर योजने अंतर्गत जिल्हयात वरील प्रमाणे देण्यात आलेल्या प्रशिक्षणार्थ्याची यादी - प्रशिक्षण दिलेल्या यंत्रणेसह व प्रत्यक्षात रोजगार मिळालेल्या प्रशिक्षणार्थ्याची यादी प्रत्यक्ष सादर करण्याबाबत मा.अध्यक्षांनी जिल्हा कौशल्य विकास अधिकारी यांना आदेश दिले. | जिल्हा कौशल्य विकास अधिकारी, |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 22 | <u>**दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना :-**</u><br>**कार्यकारी अभियंता, महावितरण :-** सदर योजने अंतर्गत जिल्हयामध्ये देवळाली, कोंड, माणकेश्वर, आवाड शिरपुरा, मांडवा, पाचपिंपळा, रोसा (डोमगाव) बारुळ, होळी या ठिकाणी 5 एम.वी.ए. क्षमतेचे उपकेंद्राचे कामे प्रस्तावित होती या पैकी आवाड शिरपुरा , पाचपिंपळा हि उपकेंद्र कार्यान्वित झाली आहेत. ईतर सात उपकेंद्रावरील कामे प्रगती पथावर असल्याचे सांगितले.<br>**मा.अध्यक्ष :-** वरील सर्व कामे पुर्ण होण्याची मुदत कधीपर्यंत होती अशी विचारणा केली.<br>**कार्यकारी अभियंता, महावितरण :-** वरील कामे पुर्ण करण्याची मुदत 16 जुलै 2019 पर्यंत होती.<br>**मा.अध्यक्ष :-** काम पुर्ण न केलेल्या कंत्राटदारावर काय कार्यवाही केली , कंत्राटदाराची नांवे ब्लॅक लिस्टमध्ये टाकली आहेत का ? सदर कामे किती रकमेची होती ?<br>**कार्यकारी अभियंता, महावितरण :-** वरील केंद्रावर कांही कामे पुर्ण केली आहेत व कांही अपुर्ण आहेत म्हणून कंत्राटदाराचे नांव ब्लॅकलिस्ट मध्ये टाकले नाहीत. सदर कामे 24 कोटी रुपयाची आहेत.<br>**मा.अध्यक्ष :-** आजच्या तारखेपर्यंत वरील उपकेंद्रनिहाय व कंत्राटदार निहाय पुर्ण झालेल्या कामाचा व अपुर्ण राहिलेले कामे कधीपर्यंत पुर्ण होतील यांबाबत अहवाल तीन दिवसात प्रत्यक्षात सादर करण्याच्या सुचना मा.अध्यक्ष यांनी महावितरण यंत्रणेस दिल्या.<br>**सभापती , पं.स.,तुळजापुर :-** कोडं उपकेंद्र अंतर्गत लाईनचे काम अपुर्ण आहे. वरील उपकेंद्राचे जास्तीत जास्त कामे श्री.पटवारी या कंत्राटदाराकडे असुन त्यांचेच कामे मोठया प्रमाणावर प्रलंबीत आहेत. जिल्हयातील शेतकऱ्याकडुन डिमांड भरुन घेतले जात नाही. डिमांड भरलेल्या शेतकऱ्यांना वीज जोडणी करुन मिळत नाहीत त्यामुळे जिल्हयातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांना विहीरीचे पाणी शेतीस देता येत नाही असे त्यांनी निदर्शनास आणुन दिले.<br>**कार्यकारी अभियंता, महावितरण :-** <u>तुळजापुर तालुक्यात</u> 1952 वीज जोडणी देण्याचा लक्षांक /स्कोप होता त्यापैकी 1460 कनेक्शन दिले आहेत 340 जोडणीसाठी इन्फ्रा लागू झाला आहे व 152 वीज जोडणी प्रलंबीत आहेत. 31 डिसेंबर 2019 पर्यंत प्रलंबीत असलेले 152 वीज जोडणी देण्यात येतील असे कार्यकारी अभियंता, महावितरण यांनी सांगितले.<br>**मा.अध्यक्ष :-** महावितरण कंपनीने त्यांचेकडील कामाचा सविस्तर आढावा घेण्यासाठी विशेष बैठकीचे आयोजन करण्याच्या सुचना मा.अध्यक्ष यांनी महावितरण कंपनीस दिल्या. | अधिक्षक अभियंता / कार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 23 | **<u>इन्फ्रास्ट्रक्चर रिलेटेड कार्यक्रम - टेलिकॉम , रेल्वे, हायवेज, मीन्स ईत्यादी :-</u>**<br>**रेल्वे विभाग :-** सदर बैठकीस रेल्वे विभागाचे कोणीही अधिकारी उपस्थित नव्हते. याबाबत संबधित अधिकारी यांना नोटीस देण्यात यावी असे मा. अध्यक्ष यांनी सुचीत केले.<br>**<u>राष्ट्रीय महामार्ग :-</u>**<br>**मा. अध्यक्ष :-** सोलापूर - धुळे राष्ट्रीय राष्ट्रीय महामार्गावरील टोलनाक्याच्या जवळ रोडच्या दोन्ही बाजूला जी गावे आहेत जसे- पाडगांव, येडशी, तामलवाडी व ईतर जवळ असलेल्या गावातील नागरिकांकडुन टोल आकारणी न करता पास देण्याची कार्यवाही करण्याच्या सुचना हायवेच्या संबधित अधिकाऱ्यांना मा. अध्यक्ष यांनी दिल्या.<br>**सभापती, पं.स. ,तुळजापूर :-** जिल्हयात राष्ट्रीय महामार्गावर अनेक ठिकाणी सर्विस रोड नाहीत कांही ठिकाणी संबधित शहरात जाणेसाठी महामार्गावर किंवा सर्विस रोडवर शहराचे नामफलक लावण्यात आलेले नाही (उस्मानाबाद शहर) त्यामुळे नागरिकांना मोठया प्रमाणात त्रास होत आहे याबाबत तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणी केली.<br>**महामार्ग संबधित अधिकारी :-** वरील प्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल असे सांगितले.<br>**<u>खाणी कर्म :-</u>**<br>**मा. अध्यक्ष :-** जिल्हयातील राष्ट्रीय महामार्गाचे कामासाठी आय.आर.बी. यांचेकडुन वापरण्यात आलेली खडी व मुरुम यासाठी जिल्हयामध्ये जे उत्खनन मोठया प्रमाणात करण्यात आले असुन त्याप्रमाणात आय.आर.बी. यांचेकडुन शासनास महसुल कमी मिळाला असल्याबाबत तक्रारी येत आहेत. याबाबतची सविस्तर माहिती आठ दिवसात प्रत्यक्षात सादर करणेबाबत जिल्हा खाणीकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय यांना मा. अध्यक्ष यांनी दिल्या. | महाप्रबंधक, दुरसंचार / महाप्रबंधक, हायवे /रेल्वे विभाग /जिल्हा खाणीकर्म अधिकारी, जि.का. |
| | सभापती , पं.स., तुळजापुर :- तुळजापूर तालुक्यातील श्रीमती रंजना जाधव यांना त्यांचे पतीचे मृत्यु प्रमाणपत्र तहसील कार्यालय, तुळजापुर येथे येणाऱ्या अडचणीमुळे बऱ्याच दिवसापासुन मिळत नाही याबाबत चौकशी करुन संबधीत अधिकारी/कर्मचारी यांचेवर कार्यवाही करावी अशी मागणी केली.<br>मा. अध्यक्ष :- या प्रकरणी तहसील कार्यालय तुळजापूर यांनी तात्काळ कार्यवाही करावी. मा. जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणी चौकशी करुन दोषी असणाऱ्या संबधित अधिकारी /कर्मचारी यांचेवर कार्यवाही करण्याच्या सुचना मा. अध्यक्ष यंानी दिल्या. | तहसीलदार, तुळजापूर मा. जिल्हाधिकारी |
| | **बैठकीतील सुचना-आदेशाचे अनुपालन :- दिशा समितीच्या बैठकीत खाते प्रमुखांनी हजर राहणे अपेक्षित असुन जे खाते प्रमुख बैठकीस स्वताः हजर** | |

Scanned by CamScanner

| | |
|---|---|
| नव्हते अशा खाते प्रमुखाना नोटीस देणे व यापुढील बैठकीस स्वतः खाते प्रमुख उपस्थित न राहिल्यास कार्यवाही अनुसरण्यात येईल असे सुचीत केले. सदर बैठकीत विषयनिहाय झालेली चर्चा त्या अनुषंगाने दिलेल्या सुचना व आदेशाचे अनुपालन विहीत मुदतीत करुन पुर्तता अहवाल पुढील बैठकीच्या अगोदर सादर करण्याच्या सुचना सर्व उपस्थित संबधित अधिकारी व यंत्रणास मा. अध्यक्ष यांनी दिल्या.<br>शेवटी उपस्थित सर्व सन्मानिय सदस्यांचे आभार मानून मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले. | |

प्रकल्प संचालक
जि. ग्रा. वि. यं. उस्मानाबाद

जिल्हाधिकारी तथा
सचिव, दिशा समिती

अध्यक्ष
दिशा समिती, उस्मानाबाद

Scanned by CamScanner